डॉ.आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

# कार्यक्रम अहवाल

## अर्थशास्त्र अध्ययन मंडळ उद्घाटन कार्यक्रम सत्र 2022- 23



डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येत आहे की,पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक. 18 / 10 / 2022 ला सकाळी 9.00 वाजता. रूम नं.01 ( Mini Auditorium) मध्ये "अर्थशास्त्र अभ्यास मंडळ" स्थापन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. तरी कृपया सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती.

प्राचार्या

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

PRINCIPAL
DR. AMBEDKAR COLLEGE
NAGPUR.

दिनांक : 18 / 10 / 2022

ठिकाण : नागपूर



डॉ.आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथील पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाच्या वतीने **अर्थशास्त्र अध्ययन मंडळ उद्घाटनाचा कार्यक्रम** दिनांक 18 ऑक्टोबर 2022 ला सकाळी 9.00 वाजता room no. 01 Mini Auditorium मध्ये संपन्न झाला.

याप्रसंगी कार्यक्रमाला प्राचार्यच्या वतीने महाविद्यालयाचे **उपप्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले** यांनी अध्यक्ष स्थान भूषवले तर **मार्गदर्शक म्हणून प्रा. राजेंद्र मोटघरे धनवटे नॅशनल कॉलेज, काँग्रेस नगर, नागपूर** हे लाभले अर्थशास्त्र अध्ययन मंडळ उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी सत्र 2022- 23 करिता अध्ययन

**मंडळ कार्यकारणी खालील प्रमाणे आली.**

| | | | |
|---|---|---|---|
| **1) राहुल गंगाडे** | **-** | **अध्यक्ष** | **एम.ए. भाग 2** |
| **2) कु. एकता राऊत** | **-** | **उपाध्यक्ष** | **एम.ए. भाग 2** |
| **3) सुजल मेश्राम** | **-** | **सचिव** | **बी.ए. भाग 2** |
| **4) श्रुती चौधरी** | **-** | **सहसचिव** | **बी.ए. भाग 2** |
| **5) मिताली रामटेककर** | **-** | **सदस्य** | **बी.ए. भाग 1** |
| **6) हिमांशू कांबळे** | **-** | **सदस्य** | **बी.ए. भाग 1** |
| **7) साखरे** | **-** | **सदस्य** | **बी.ए. भाग 1** |

अर्थशास्त्र अध्ययन मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी लाभलेले मार्गदर्शक प्रा. राजेंद्र यांनी अध्ययन मंडळाच्या उद्घाटनाची औपचारिक घोषणा करताना अध्ययन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची जबाबदारी काय आहे, त्यांनी कशाप्रकारे तर्कसंगत, वैज्ञानिक आधारावर आणि समाजभिमुख मुद्द्यावर कार्यक्रमांचे आयोजन विभागातील प्राध्यापकांच्या वतीने आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे मत प्रथम दर्शनी मांडले.

The God Market: How Globalization is Making India More Hindu (2009) या **मीरा मंदा** लिखित 17 वर्षे संशोधन करून निघालेल्या निष्कर्षावर आधारित पुस्तकांचा त्याचप्रमाणे ''The Uncertain Glory (2013)'', अमर्थ सेन/ जीन ड्रीझ यांच्या पुस्तकाच्या आधारे नवीन शैक्षणिक धोरण समजायचं असेल तर त्यासाठी नवीन आर्थिक धोरणाचा आंतर संबंध जोडणे अत्यावश्यक आहे.

देशाच्या आर्थिक प्रगतीकडे पाहत असताना **2021-22** च्या मानव विकास अहवाल (**एस. डी. आर. 2021- 22**) अनिश्चित काळ या शीर्षकाने प्रकाशित अहवाल हे सांगतो की, **191** देशात भारताचा स्थान **132** वा आहे **ग्लोबल हंगर इंडेक्स 2022** यात भारताचा स्थान **121** देशात मागील वर्षीच्या **101** वरून **107** वर गेलेला आहे **हॅप्पीनेस इंडेक्स 146** देशात **मध्ये 136 वा** तर **जेंडर इक्वलिटी मध्ये 146 मध्ये 135** व्या स्थानावर भारत आहे.

अशा आर्थिक पातळीवर वेगवेगळ्या घटकावर चौकस व तर्कसंगत दृष्टीने समजून घेण्याची गरज असल्याचे मत प्रा. **मोटघरे** सर यांनी मांडले त्याचबरोबर रुपयाच्या घसरणीकडेही

दृष्टीशेप टाकावा आणि कौशल्य गुणांचा विकासाचा विचार करता अभ्यासक्रमात प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी सरकार त्यासाठी कौशल्यावर आधारित उद्योगांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार कौशल्य गुण विकसित करणे, विद्यार्थ्यांना गरजेचे असल्याचे ते मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. अविनाश फुलझेले यांनी अनेक आर्थिक घटनाचे ऐतिहासिक दाखले देताना आजची कृषी उत्पन्न बाजार समिती ही जी संस्था आपण पाहतो त्याची मुहूर्तमेढ अल्लाउद्दीन खिलजीच्या आर्थिक धोरणात असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक **डॉ. हरीश बावनगडे** यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. **प्रभाकर बडोले** यांनी केले. मार्गदर्शकांचा परिचय **डॉ .राजेंद्र तांबे** यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्थशास्त्र अध्ययन मंडळाचे अध्यक्ष **राहुल गंगाडे** यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक आणि मोठ्या संख्येत विद्यार्थी उपस्थित होते आणि कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

ठिकाण : **नागपूर** **अर्थशास्त्र विभाग**

दिनांक : १८/१०/२०२२ **डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर**




GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Deekshabhoomi, Nagpur, Maharashtra
440010, India
Lat 21.129986°
Long 79.067663°
18/10/22 10:07 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Deekshabhoomi, Nagpur, Maharashtra
440010, India
Lat 21.130008°
Long 79.067687°
18/10/22 09:23 AM GMT +05:30
Google